पान १ वरुन

क्लोजर रिपोर्टमध्ये ईडीच्या हस्तक्षेप अर्जाला मुंबई पोलिसांचा विरोध!

झाले नसल्याचे म्हटले होते तसेच अजित पवार यांना क्लीन चिट देण्याची शिफारसही करण्यात आली होती. ईओडब्ल्यूने या प्रकरणात सप्टेंबर २०२० मध्ये आपला पहिला क्लोजर रिपोर्ट सादर केला होता. मात्र, ऑक्टोबर २०२२ मध्ये ईडीने निषेध याचिकांत उपस्थित मुद्द्यांच्या आधारे या प्रकरणाचा आणखी तपास करावयाचा असल्याचे न्यायालयात सांगितले होते. त्यावेळी न्यायालयाने ईडीची हस्तक्षेप याचिका फेटाळून लावली होती. ईओडब्ल्यूने दुसरा अहवाल सादर करताना बँकेने साखर कारखान्यांना दिलेल्या कर्जाची रक्कम कायदेशीर मार्गाने वसूल केली जात असल्याचे नमूद करीत हे प्रकरण बंद करण्याची विनंती केली होती. या घोटाळ्याशी संबंधित मनी लॉडरिंग प्रकरणाचा तपास करणाऱ्या ईडीने हस्तक्षेप अर्ज दाखल केला होता.

संरक्षण क्षेत्रात सुधारणांना सर्वोच्च प्राधान्य

अभिभाषणात राष्ट्रपतींचे प्रतिपादन : आणीबाणी हा काळा डाग; विरोधकांची घोषणाबाजी

नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा

संरक्षण क्षेत्रात स्वावलंबी होण्याला आणि अधिकाधिक सुधारणा करण्याला सरकारने सर्वोच्च प्राधान्य दिले असून आज भारत एक लाख कोटींपेक्षा अधिक किमतीच्या संरक्षण साधनांची निर्मिती करत आहे. फिलिपाईन्ससोबतचा ब्राह्मोस करार हा संरक्षण क्षेत्रात भारताच्या मजबूत पकडीचा परिणाम असल्याचे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरुवारी अठराव्या लोकसभेच्या पहिल्या अभिभाषणात केले.

त्यांनी आणीबाणी हा संविधानावरील सर्वात मोठा हल्ला आणि काळा डाग होता, असेही सांगितले. त्यावरून विरोधकांनी तीव्र नाराजी व्यक्त करून हे जनादेशाच्या विरोधातील अभिभाषण असल्याची भावना व्यक्त केली.

आमच्या सैन्याने भारतीय कंपन्यांकडूनच शस्त्रे आणि उपकरणे खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. सैनिकांचीही काळजी घेतली जात आहे. त्यामुळे चार दशकांनंतर 'वन रँक वन पेन्शन' योजना लागू करण्यात आली. संरक्षण क्षेत्रात स्वावलंबी होण्यासाठी सरकार उत्तर प्रदेश आणि आणि तामिळनाडूमध्ये दोन संरक्षण कॉरिडॉर विकसित करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

भारत होणार जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था

राष्ट्रपतींनी रालोआ सरकारच्या पुढील पाच वर्षांचा रोडमॅप मांडला. त्यात देशाच्या विकासासाठी अर्थव्यवस्थेतील सुधारणांबाबत ऊहापोह करण्यात आला. भारताला जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनविण्याचा संकल्प दाखवून सरकारच्या अर्थसंकल्पात येणाऱ्या दूरगामी धोरणांचे संकेत त्यांनी दिले.

महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाला समर्पित सरकारने महिला सक्षमीकरणाच्या नव्या युगाची सुरुवात केली आहे. देशातील महिला शक्ती दीर्घकाळापासून लोकसभा आणि विधानसभेत अधिकाधिक सहभागाची मागणी करत होती. आज त्यांच्याकडे नारी शक्ती वंदन कायद्याची ताकद आहे. विकसित भारताची निर्मितीसाठी गरीब, तरुण, महिला शक्ती आणि शेतकरी सक्षम झाला पाहिजे. यासाठी सरकार प्राधान्य देत असल्याचे त्यांनी सांगितले.

सरकारी नोकरभरती असो की परीक्षा, कोणत्याही कारणाने त्यात व्यत्यय येत असेल, तर ते योग्य नाही. पेपरफुटीच्या अलीकडील घटनांची निःपक्षपातीपणे चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा देण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असे निःसंदिग्ध आश्वासन राष्ट्रपतींनी अभिभाषणादरम्यान दिले.

भारत जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्ट-अप इको सिस्टीम

सरकारने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू केले. गेल्या १० वर्षांत देशात ७ नवीन आयआयटी, १६ आयआयआयटी, ७ आयआयएम, १५ नवीन एम्स, ३१५ वैद्यकीय महाविद्यालये आणि ३९० विद्यापीठे स्थापन झाली आहेत. त्याचबरोबर डिजिटल विद्यापीठ तयार करण्याच्या दिशेनेही सरकार प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

उत्पादन, सेवा, शेतीला विशेष महत्त्व

रिफॉर्म, परफॉर्म आणि ट्रान्सफॉर्मच्या संकल्पामुळे आज भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था बनला आहे. १० वर्षात अर्थव्यवस्थेच्या बाबतीत जगात भारत ११ व्या क्रमांकावरून पाचव्या स्थानावर पोहोचला आहे. उत्पादन, सेवा आणि कृषी या अर्थव्यवस्थेच्या तीनही स्तंभांना सरकार समान महत्त्व देत आहे.

निवडणूक आयोगाचे कौतुक

राष्ट्रपतींनी लोकसभा निवडणुकीच्या आयोजनाबाबत निवडणुक आयोगाचेही कौतुक केले. लोकसभा निवडणूक जगातील सर्वात मोठी निवडणूक होती. जम्मू काश्मीर खोऱ्यातील उत्साहात झालेले मतदान, प्रथमच घरपोच मतदानही घेण्यात आले. यासाठी निवडणूक आयोगाच्या प्रत्येक कर्मचाऱ्याचे कौतुक आणि अभिनंदन करते, असे त्या म्हणाल्या.

आगामी अधिवेशनात सरकार आपल्या कार्यकाळातील पहिला अर्थसंकल्प सादर करणार आहे. मोठ्या आर्थिक आणि सामाजिक निर्णयांसोबतच अनेक ऐतिहासिक पावलेही या अर्थसंकल्पात पाहायला मिळतील, असे म्हणत त्यांनी अर्थसंकल्पात मोठे निर्णय होणार असल्याचे संकेत दिले आहेत.

अखिलेश यांच्यासाठी राहुल यांचा निरोप

● राष्ट्रपतींच्या अभिभाषणादरम्यान जवळपास सर्वच प्रमुख पक्षांचे प्रमुख नेते पुढच्या रांगेत बसले होते. समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव दहाव्या रांगेत बसले होते. विरोधी बाकावर बसलेल्यांच्या पुढच्या रांगेत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह राहुल गांधी बसले होते. अखिलेश यादव पुढच्या रांगेत बसलेले नसल्याचे पाहून राहुल गांधींनी मागे वळून तिसऱ्या रांगेत बसलेल्या के. सी. वेणुगोपाल यांना विचारले. राहुल यांचे म्हणणे ऐकून त्यांच्या मागच्या रांगेत बसलेले तृणमूलचे डेरेक ओब्रायन यांनी दहाव्या रांगेत बसलेल्या अखिलेश यादव यांना हाताच्या इशाऱ्याने बोलावले आणि त्यांच्या शेजारील रिकाम्या आसनावर बसवले.

नवी दिल्ली : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरुवारी संसदेत दोन्ही सभागृहांच्या सदस्यांना उद्देशून अभिभाषण केले.

अभिभाषणातील ठळक मुद्दे

- पुढील पाच वर्षांचा रोडमॅप
- गरीब, तरुण, महिला, शेतकऱ्यांच्या सक्षमतेवर भर
- 'नीट' प्रकरणाची निष्पक्ष चौकशी
- अर्थसंकल्पात मोठे निर्णय होण्याचे संकेत
- ईशान्य भारतात वेगाने विकासकामे

आणीबाणी हा काळा अध्याय

● देशात संविधान लागू झाल्यानंतरही अनेकवेळा राज्यघटनेवर हल्ले झाले. २६ जून १९७५ रोजी लागू करण्यात आलेली आणीबाणी हा राज्यघटनेवर थेट हल्ल्याचा सर्वात मोठा आणि काळा अध्याय होता. त्यानंतर संपूर्ण देशात हाहाकार माजला होता. तथापि अशा असंवैधानिक शक्तींवर देशाने विजय मिळवून दाखवला. कारण भारताला प्रजासत्ताकाची समृद्ध परंपरा लाभल्याचे त्यांनी सांगितले.

नीट आणि मणिपूरवरून गदारोळ

● राष्ट्रपतींच्या अभिभाषणादरम्यान विरोधकांनी 'नीट' आणि मणिपूरवरून गदारोळ केला. नव्या शैक्षणिक धोरणावर राष्ट्रपतींनी बोलण्यास सुरुवात करताच विरोधकांकडून 'नीट-नीट'चे नारे दिले. मात्र राष्ट्रपतींनी आपले भाषण थांबवले नाही. पुन्हा पुन्हा आवाज आल्यावर त्या खासदारांना 'ऐका-ऐका' असे म्हणाल्या.

निरोपाचे नाही; निश्चयाचे, निर्धाराचे अधिवेशन

आमदार निरोप समारंभात मुख्यमंत्र्यांची टोलेबाजी

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

सरकारसाठी हे निरोपाचे अधिवेशन नसून राज्याचा विकासाचा निर्धार आणि पुढल्या निवडणुकीत विजयाचा निश्चय करणारे अधिवेशन आहे, असा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना लगावला. हे निरोपाचे अधिवेशन असल्याचा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला होता. त्याला शिंदेंनी त्यांच्या शैलीत उत्तर दिले.

विधान परिषदेतील आमदार सुरेश धस, प्रवीण पोटे पाटील, रामदास आंबटकर, नरेंद्र दराडे, विप्लव बाजोरिया हे २१ जून २०२४ रोजी निवृत्त झाले. या निवृत्त झालेल्या सदस्यांना विधिमंडळ मध्यवर्ती सभागृहात झालेल्या समारंभात निरोप देण्यात आला. यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र विधिमंडळातील वरिष्ठ सभागृह असलेल्या विधान परिषदेत अनेक ज्येष्ठ सदस्यांच्या विचारांची परंपरा लाभलेली आहे. या सभागृहाच्या माध्यमातून संसदीय आयुधांचा वापर करून सदस्यांनी जनतेचे प्रश्न सोडविण्यात आल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री शिंदे यांनी शुक्रवारी काढले.

मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी निवृत्त झालेल्या सदस्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. इथे सर्व सभासद येतात, ते जनतेला न्याय देण्यासाठी येतात. निवृत्त होणाऱ्या सदस्यांनी लोकसेवा करण्यासाठी या सभागृहात पुन्हा येण्यासाठी प्रयत्न करावेत, असे मुख्यमंत्री म्हणाले.

राजकारणात फक्त जनताच निवृत्त करु शकते : देवेंद्र फडणवीस

आज जे सदस्य निवृत्त होत आहेत, ते निवृत्त होत आहेत असे मी म्हणणार नाही. त्यांचा कार्यकाळ संपत आहे. कारण राजकारणातून फक्त जनता कोणाला तरी निवृत्त करू शकते. राजकारणात तशी निवृत्ती नसते, त्यामुळे जोपर्यंत जनतेचा विश्वास त्यांच्यावर आहे. ते कुठल्या ना कुठल्या सभागृहामध्ये निश्चितपणे येऊ शकतात, अशा शुभेच्छा यावेळी फडणवीस यांनी दिल्या. विधान परिषद हे ज्येष्ठांचे सभागृह आहे. विचारमंचाचे सभागृह आहे. विविध वैचारिक चर्चा या सभागृहात होतात. मर्यादित सदस्य संख्या असल्यामुळे त्यांच्या विचाराला या ठिकाणी अधिक चांगला वाव मिळतो, असेही ते म्हणाले.

अजित पवारांनीही दिल्या शुभेच्छा

सर्व निवृत्त होणाऱ्या सदस्यांची सभागृहातील कामगिरी व योगदान याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवारांनी अभिनंदन केले. विधान परिषद या महत्त्वाच्या सभागृहात काम करून सभागृहात जनतेचे विविध प्रश्न सोडवण्यासाठीचा अनुभव घेतल्याने भविष्यात अधिक उत्तम काम आपल्या माध्यमातून होईल, जनतेबद्दलची तळमळ त्यांना नक्कीच पुन्हा काम करण्याची संधी उपलब्ध करून देईल, असे त्यांनी सांगितले.

जाहीर सूचना

माझी पक्षकार श्रीमती प्रमिला क्रीष्णा जांभूळकर यांच्या वतीने सर्व साधारण जनतेस सुचित करण्यात येत आहे की सदनिका क्र. ९४४, ओशिवरा रिद्धी-सिध्दी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, कोड ०३४, एम. एच. बि. कॉलनी, अदर्श नगर, न्यू लिंक रोड, ओशिवरा, जोगेश्वरी (प), मुंबई– ४००१०२, श्री रामदास क्रीष्णाराव जाधव यांच्या नावे मुंबई क्षेत्रविकास व गृहनिर्माण मंडळ – व्दारे वितरित करण्यात आली होती. (इथून पूढे सदर सदनिका असा उल्लेख)

वर नमूद मूळ मालक श्री रामदास क्रीष्णाराव जाधव यांनी वैध करारनामा व्दारे ०१/०३/१९९१ रोजी सदर सदनिका माझी पक्षकार यांचे पती श्री क्रीष्णा भिवराज जांभूळकर यांना विकली होती.

माझी पक्षकार यांचे पती श्री क्रीष्णा भिवराज जांभूळकर यांनी बक्षीस पत्रा व्दारे दिनांक ०६/०४/२०२३ रोजी माझी पक्षकार यांना सदर सदनिका बक्षीस केली.

आता माझी पक्षकार सदर सदनिका, सभासद व भाग पत्र स्वतःच्या नावे ओशिवरा रिद्धी-सिध्दी सहकारी गृहनिर्माण संस्था येथे करू इच्छीतात.

जर कोणा व्यक्तिस किंवा मूळ मालकाच्या कुटुंबातील सदस्य व इतर कोणी व्यक्ति यांना वरिल नमुद सदर सदनिका माझी पक्षकार यांच्या नावे ओशिवरा, रिद्धी-सिध्दी सहकारी गृहनिर्माण संस्था येथे हस्तांतरित करून घेण्यास व संस्थेचे सभासद व भागपत्र बदलण्यास कुठलीही हरकत असेल किंवा कोणताही दावा, आक्षेप, अधिकार असल्यास त्यांनी लेखी स्वरुपात कागदोपत्री पुराव्यांसह माझ्या खाली नमूद केलेल्या पत्यावर त्यांच्या सदर मालमत्तेच्या अधिकाराबाबत आणि सदर मालमत्तेच्या हस्तांतरणाबाबत आक्षेप / दाव्यांचे पूष्ठर्थ दस्तावेज व इतर पुराव्यांच्या प्रतिंसह सदर सूचना प्रकाशन तारखेपासून १५ दिवसात कळवावे अन्यथा सदर सदनिका व त्यांचे सभासदत्व आणि समभाग हे सर्व अधिभार किंवा दावित्यापासून अश्या दाव्यांच्या संदर्भाशिवाय, मुक्त आहे असे घोषित केले जाईल आणि तदनंतर ते त्याग किंवा स्थगित केले आहेत असे समजले जाईल.

ठिकाण : मुंबई,
दिनांक : २८/०६/२०२४

यांचेतर्फे
श्रीमती प्रमिला क्रीष्णा जांभूळकर
संपर्क – ॲड.श्रध्दा धमाले
मोबाईल:९९३०२७७८४६
ईमेल–dhamale.shraddha1@gmail.com

जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, निवासी फ्लॅट क्र. २१, २ रा मजला, मोजमापित ४१० चौ. फूट चटई क्षेत्रफळ, इमारत क्र. बी - ७, इमारत क्र. ५,६,७,८,९ विजय नगरी अनेक्स को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. म्हणून ज्ञात, विजय नगर अनेक्स कॉम्प्लेक्स, वाघबीळ नाका, कावेसर, घोडबंदर रोड, ठाणे (पश्चिम) - ४००६१५, सर्व्हे क्र. १३६, १३७ व १३८, हिस्सा क्र. ५ धारक जमिनीवर निर्मित, गाव कावेसर, तालुका व जिल्हा ठाणे, ठाणे महानगरपालिका हद्दीतील या मालमत्तेसंदर्भात विजय गृहनिर्माण प्रायव्हेट लिमिटेड - बिल्डर प्रथम भाग व श्री. मार्क डीसुझा - खरेदीदार दुसरा भाग यांच्या दरम्यान केलेला करार दि. १६.०४.१९९९ द्वारे सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, सदर मालमता ही खरेदीदारांना विक्री करण्यात आली होती.

व ज्याअर्थी, विजय गृहनिर्माण प्रायव्हेट लिमिटेड - बिल्डर प्रथम भाग व श्री. मार्क डीसुझा - खरेदीदार दुसरा भाग यांच्या दरम्यान केलेला करार दि. १६.०४.१९९९ हा हरवला आहे व यासंदर्भात संबंधित पोलीस स्टेशनमध्ये पोलीस तक्रार दाखल करण्यात आली आहे.

कोणाही व्यक्तीचा सदर फ्लॅटमध्ये वा सदर फ्लॅटच्या ताब्यासंदर्भात कोणत्याही स्वरूपात कोणताही करार, अनुबंध, विक्री करार, हस्तांतरण, विनिमय, अभिहस्तांतरण, अभिहस्तांकन, प्रभार, गहाण, भेट, न्यास, उत्तराधिकार, भाडेकरार, धारणाधिकार, मासिक वहिवाट, लिव्ह ॲन्ड लायसेन्स, भागीदारी, संयुक्त उद्यम, सुविधाधिकार, पूर्वक्रय अधिकार, कोणत्याही स्वरूपातील कोणताही विपरीत हक्क वा दावा, विवाद, खटला, निवाडा, आदेश, प्रतिबंधात्मक निषेधाज्ञा, मनाई हुकूम, जप्ती, संपादन वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही हक्क, अधिकार, हितसंबंध वा दावा असल्यास, त्यांनी त्यासंदर्भात सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या आत अधोहस्ताक्षरितांना लिखित स्वरूपात अधोहस्तआक्षरितांच्या योग्य लिखित पोचपावतीसह हातबटवड्याद्वारे वा रजिस्टर्ड पोस्ट एडीद्वारे सूचित करावे अन्यथा असा कोणताही दावा हा अधित्यागित व /वा परित्यागित समजण्यात येईल.

दिनांक : २८.०६.२०२४

राजकुमार के. शुक्ला लॉ फर्म,
वकील व कन्सल्टंट्स
कार्यालय क्र. १०, २ रा मजला, इमारत क्र. ८४,
जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

मुख्यमंत्री पदासाठी ठाकरेंचे नाव रेटण्याचा राऊतांचा प्रयत्न

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

निवडणुकीस सामोरे जाण्याआधी मुख्यमंत्री पदाचा उमेदवार जाहीर करा, अशी मागणी करून अप्रत्यक्षपणे या पदासाठी उद्धव ठाकरेंचे नाव पुढे रेटण्याच्या शिवसेना नेते संजय राऊत यांच्या कृतीवर महाविकास आघाडीतील नेते नाराज आहेत. त्यांच्या या वक्तव्याचा तिखट शब्दांत विरोध करणे टाळत निवडणुकीनंतर एकत्र बसून याबाबत निर्णय घेण्यात येईल, अशा शब्दांत मित्र पक्षांनी राऊतांना व शिवसेनेला सबुरीचा सल्ला दिला आहे.

या विषयावर काहीही भाष्य करण्यास काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी नकार दिला.

एकत्र बसून ठरवू : जयंत पाटील

महायुतीला हरवणे हे महाविकास आघाडीचे पहिले लक्ष्य आहे. महायुतीला सत्तेवरून खाली खेचायचे आहे. आम्ही सत्तेत आल्यानंतर मुख्यमंत्री कोण असेल? हे आम्ही एकत्र बसून ठरवणार आहोत. त्यामुळे सध्यातरी मुख्यमंत्री कोण? याबाबत चर्चा करण्यात काहीही अर्थ नसल्याचे सांगत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी राऊतांच्या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लावल्या.

चर्चा करून निर्णय : विजय वडेट्टीवार

सर्वात आधी याविषयी चर्चा करण्यासाठी महाविकास आघाडीची एकत्रित बैठक होईल. या बैठकीत मुख्यमंत्री कोण होईल, हे ठरवले जाईल, असे विधान सभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सांगितले. जो निर्णय असेल तो चर्चा करून घेतला जाईल, अशा शब्दांत निवडणुकीपूर्वी अशा निर्णयाची शक्यता नसल्याचे त्यांनी सूचित केले.

दानवेंची सावध भूमिका

मुख्यमंत्री कोण? हा विषय महत्त्वाचा नाही. शिवाय, याबाबतचा निर्णय 'मविआ'च्या बैठकीत घेतला जाईल, असे म्हणत विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते तथा उद्धव ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी सावध भूमिका घेतली आहे. सध्या महायुतीचा पराभव करणे जास्त महत्त्वाचे असल्याचेही दानवे यांनी म्हटले आहे.

'मविआ'तील मित्रपक्षांचा सबुरीचा सल्ला

राऊतांच्या वक्तव्यावर भाष्य करण्यास पटोलेंचा नकार

● उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करावा या शिवसेना खासदार संजय राऊत यांच्या वक्तव्यावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाष्य करण्यास नकार दिला. महाविकास आघाडीत काँग्रेस हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष आहे. पण मोठा भाऊ, छोटा भाऊ अशी कोणतीच भूमिका नसून सर्वांनी एकत्रपणे विधानसभा निवडणुकीला सामोरे जावे, अशी काँग्रेसची भूमिका आहे, असे पटोले यांनी स्पष्ट केले.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

TENDER NOTICE

Following Tender is invited from Eligible Bidders under Pen Circle, Raigad District. The Details are as given below-

Sr. No.	Tender No.	Particulars	Sale Opening, Sale Closing Dates & Bid Submission	Estimated Cost (Rs.)	Amount of EMD (Rs.)	Tender Cost Fee
1	SE/PC/Tech/ 2024-25/T-3	Full Turnkey Contract for PVTGs HH System Strengthening work of Pen Circle Under PVTG scheme	Dt.26/06/2024 To Dt.9/07/2024 Bid Submission Date: 9.07.2024 upto 18:00 hrs.	472.33/-	472330/-	11,800/-

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://works.mahadiscom.in/eTender/etender.

HO PR NO.148/24 Dt.26.06.24

Sd/-
SUPERINTENDING ENGINEER (PC), PEN

एल&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स लिमिटेड, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय: मुंबई

L&T Finance

गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 26.06.2024 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. विनोद पद्मासनम 2. पूजा विनोद	मालमत्तेच्या पत्त्याचे सर्व तुकडा आणि पार्सल: फ्लॅट क्रमांक 902 इ विंगमध्ये 9व्या मजल्यावर, चटई क्षेत्र 593 चौ.फूट, निव्वळ बाल्कनी क्षेत्र 49 चौ.फूट, एकूण क्षेत्रफळ 642 चौ.फूट. कासा फोंटाना बिल्डिंगमध्ये सेंट्रल पार्क, कल्याण शिल रोड, डोंबिवली पूर्व, ठाणे, महाराष्ट्र 421203 येथे एका कार पार्किंगच्या जागेसह स्थित आहे.	H175031901210222 33 & H175031901210222 33L	11 जून 2024	रु. 4,21,680/-	रु. 60,93,407.53/-	रु. 42,16,800/-	सर्व कामकाजाच्या दिवशी भेटीची वेळ निश्चित करून	01-08-2024 सकाळी 10 ते संध्याकाळी 5:30

सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **31/07/2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **01/08/2024**रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **02/08/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेची तपासणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात उदा., **नाव – हरिलाल गुप्ता, एल&टी फायनान्स लिमिटेड, संपर्क क्रमांक 8080302861 आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल अँड टी फायनान्स लिमिटेड, ऑफिस: 6 मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं.177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरूमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई – 400 098.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी स्वीकार/नाकारू/सुधारू/रद्द करू शकतात. कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता ई-लिलाव बोली/ऑफर किंवा पुढे ढकलू शकतात.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 28.06.2024
ठिकाण: मुंबई

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

विधानसभा निवडणुकीत बारामतीत पवार विरुद्ध पवार

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभा निवडणुकीतही बारामतीमध्ये पवार विरुद्ध पवार लढत होणार असून त्यामध्ये आमच्या पक्षाची व्यक्ती विजयी होईल, असा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये गुरुवारी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. रोहित पवार म्हणाले, लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आठ उमेदवार निवडून आल्यापासून अजित पवार गटाच्या २५ आमदारांनी आमच्याशी संपर्क साधला आहे. विधानसभा निवडणुकीत काहीजणांना पक्षात पुन्हा घेण्याबाबत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील चर्चा करत आहेत.

रोहित पवार यांचा दावा

अजित पवार यांच्या पक्षातील नेत्यांचा त्यांच्यावर विश्वास राहिला नाही; तर महायुतीमधील मित्र पक्षांच्या नेत्यांचे अजित पवार यांच्याबद्दल चांगले मत नाही. यावरून अजित पवार यांना महायुतीमध्ये एकटे पाडून लढवण्याचा प्रयत्न होत आहे, असे रोहित पवार म्हणाले.

दानवे, पंकजा मुंडेंसह विविध नावे विधान परिषदेसाठी चर्चेत

नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्रात विधान परिषदेच्या ११ जागांसाठी १२ जुलैला निवडणूक होत आहे. यामध्ये भाजप पाच जागा लढवण्याची शक्यता आहे. यासाठी रावसाहेब दानवे, पंकजा मुंडे यांच्यासह अन्य नेत्यांच्या नावावर विचार सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली.



महायुतीमधील कोणता पक्ष किती जागा लढवणार हे अद्याप स्पष्ट झाले नसले तरी भाजपमध्ये विविध नावे चर्चेत आहेत. भाजपच्या कोट्यातून पुन्हा एकदा रासपचे अध्यक्ष महादेव जानकर यांना संधी मिळणार असून एका महिला नेत्यालाही संधी मिळू शकते. जानकर वगळता चार जागांसाठी दहा नावे चर्चेत आहेत. यामध्ये रावसाहेब दानवे, पंकजा मुंडे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, माजी मंत्री परिणय फुके, आमदार नीलय नाईक, च